# Washim District Police

**Nature of Work** :- **Helping Child in Distress Situation**

**Police Station** :- **Karanja City**

**Date of Good Work done** :- **28/12/2021**

**Brief of the work done :-**

पो.स्टे. कारंजा शहर येथील अल्पवयीन विद्यार्थ्यांवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या शिक्षकास जेरबंद करण्यात आले आहे. अशा घटनांबाबत पालकांनी आणि मुलांनी निःसंकोचपणे तक्रार देणे बाबत पोलीस दलाकडून आवाहन करण्यात येत आहे.

## 'त्या' गुरूजीला तीन दिवसांची पोलीस कोठडी

देशोन्नती वृत्तसंकलन...

- **कारंजा येथील विद्यार्थ्यांशी लैंगिक चाळे प्रकरण**
- **वेदशास्त्राचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्याने दिली तक्रार**

**कारंजा** ■ येथील गुरूमंदिर संस्थानच्या वतीने चालविण्यात येत असलेल्या वेद पाठशाळेत एका १३ वर्षीय वेदशास्त्राचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्याच्या तक्रारीवरून २४ डिसेंबरला कारंजा शहर पोलीसांनी वेदशास्त्राचे धडे देणाऱ्या अजय भगवानराव पाठक या गुरूजींविरूध्द बाललैंगिक अत्याचाराचा गुन्हा दाखल करून गुरूजींना ताब्यात घेतले होते. २५ डिसेंबरला गुरूजींना कारंजा न्यायालयापुढे हजर केले असता न्यायालयाने गुरूजींना तीन दिवसांची म्हणजेचे २८ डिसेंबरपर्यंत पोलीसकोठडी सुनावली.

कारंजा येथील वेदपाठशाळेत कारंजासह इतर शहरातील विद्यार्थी वेदशास्त्राचा अभ्यास करतात. यातील काही विद्यार्थ्यांना आरोपी पाठक गुरूजी हे वेद शिकविल्यानंतर हातपाय दाबण्याच्या बहाण्याने बोलावीत होते. आणि त्यांच्यासोबत लैंगिक विकृत चाळे करीत होते. ही घटना यापूर्वीही वारंवार घडली होती. परंतु त्या संदर्भात तक्रार देण्याकरीता कोणी पुढे आले नाही. अशातच एका १३ वर्षीय विद्यार्थ्याने घडलेल्या प्रकाराबाबत आपल्या आईवडीलांना सांगितले असता आईवडिलांनी मुलासह थेट शहर पो स्टे गाठले. आणि घडलेली आपबिती ठाणेदार आधारसिंग सोनोने यांच्यासमोर कथन केली. घडलेला प्रकार गंभीर असल्याने पोलीसांनी दाखल फिर्यादीवरून आरोपी गुरूजी अजय भगवानराव पाठक यांच्याविरूध्द भांदविच्या कलम ३७७, ५०६ तसेच बाल लैंगिक अत्याचार अधिनियम ४ व ६ नुसार गुन्हा दाखल करून गुरूजींना जेरबंद केले.

त्यानंतर दुसऱ्यादिवशी न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने आरोपी गुरूजी अजय पाठक यांना तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. शिक्षणाची पंढरी म्हणून ओळख असलेल्या कारंजा शहरात असा घृणास्पद प्रकार घडल्याने कारंजा शहराच्या नावाला काळीमा फासल्या गेला अशा प्रतिक्रिया सर्वसामान्यातून उमटत असून गुरूजींप्रती रोष व्यक्त केल्या जात आहे. (ता.प्र.)